**नि.दि.दा.क्र.८८/२०१७**
**दत्तात्रय वि. मारुती व इतर**
**नि. क्र. ५० पुढे सुरु**

नि.क्र.८४ वरील आदेशानुसार साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु
**प्रतिवादी क्र.१ यांच्यातर्फे विधिज्ञ श्री यु.एच.सणस**

३१. मृत्यूपत्राप्रमाणे आमच्या नावाची नोंद व्हावी याकरिता ग्रामपंचायतीकडे व तलाठीकडे अर्ज दिले होते. तरीसुध्दा आमच्या नावाने नोंदी झालेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही केलेले अर्ज आमची नोंद न होता निकाली निघालेले आहे. मी ते अर्ज दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे मृत्यूपत्र बेकायदेशीर असलेने आमच्या नावे नोंदी झाल्या नव्हत्या. मी नियमीत दिवाणी दावा क्र. २०/८८ ची कागदपत्रे दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, स्पेशल दिवाणी मुकादमा नं. ४०/२०१७ मध्ये मारुती गार्डे हे वादी आणि आम्ही दोघे भावंडे प्रतिवादी क्र ४ व ५ होतो. त्या दाव्यात आमचे वकिल देखील श्री. ए.के.शिंदे होते. मारुती गार्डे यांच्या मृत्यूनंतर सदरचा दावा वादी म्हणून आम्हास चालविणेची परवानगी मिळावी याकरिता आम्ही आमचे विधीज्ञ श्री. शिंदे यांचेमार्फत अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, तो अर्ज फेटाळण्यात आला होता. साक्षीदार सांगतो की, सदरचा अर्ज मंजूर होवून त्या दाव्यात आम्हास वादी म्हणून परवानगी देण्यात आली होती. मी त्या आदेशाची प्रत दाखल करु शकतो. त्या आदेशाबाबत मला माझ्या विधीज्ञांकडून कळाले होते. सदरचा दावा वाई न्यायालयात वर्ग झालेला आहे. त्याबाबतची कागदपत्रे मी दाखल करु शकतो.

३२. माझ्या म्हणण्याप्रमाणे मारुती गार्डे यांच्या मृत्यूपूर्वी चाळीस वर्षापासून आम्ही प्रतिवादी क्र २ आणि ३ त्यांचा सांभाळ करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे त्यांना त्यांच्या औषधोपचाराकरिता, कपडेलत्त्याकरीता अथवा इतर कोणत्याही कारणाकरिता पैशांची गरज पडली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, असे असताना देखील सन २००५ साली मारुती गार्डे यांनी त्यांच्या मिळकतीबाबत खरेदी विक्रीचा व्यवहार केला आहे. तसेच त्या नंतर देखील आणखी एका मिळकतीबाबत त्यांना गरज नसताना खरेदी विक्रीचा व्यवहार झाला होता. साक्षीदार सांगतो की त्यांची मुलगी प्रतिवादी क्र १ हिला

आर्थीक गरज होती. त्याबाबत सदरील खरेदी दस्तांमध्ये उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, उपरोक्त दोन्ही खरेदीखत प्रतिवादी क्र १ मंगल व मारुती यांच्यात वाटप झालेले नसताना झाली आहेत. त्या खरेदी खतांमध्ये माझे वडील चुलते मारुती यांची नावे लिहून देणार सदरी आहेत.

३३. निशाणी क्र ५७ वरील मृत्यूपत्र कोणी टंकलिखीत केले हे मला सांगता येणार नाही. त्याचा ड्राफट कोणी केला होता हे देखील मला सांगता येणार नाही तसेच त्याबाबत मी आजतागायत चौकशी देखील केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मूळ मृत्यूपत्र अभिलेखावर दाखल नाही. मृत्यूपत्रसह गट नं २०६५ चा उतारा जोडला आहे. त्याचे कारण मला सांगता येणार नाही. तसेच त्या मृत्यूपत्रासह गट क्र २०८८ देखील उतारा जोडला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या उता-याला मालक व वहिवाट सदरी प्रतिवादी क्र १अ मंगल हिच्या नावाची नोंद आहे. ती नोंद सन १९९५ पासून असल्याचे मला सांगता येणार नाही. ती नोंद मारुती गार्डे यांनी दिलेल्या संमतीपत्रवरुन झाल्याचे मला माहिती नाही. सदरील संमतीपत्रवर माझ्या वडीलांची देखील सही असल्याचे मला सांगता येणार नाही. मृत्यूपत्रासह दाखल असलेल्या एका उता-यावर मारुतीची पत्नी खाशीबाई हिच्या नावाची नोंद असल्याचे मला सांगता येणार नाही. मृत्यूपत्रसह मारुतीची नावे नसलेले उतारे का जोडले याचे कारण मला सांगता येणार नाही.

***न्यायालयीन वेळ संपल्यामुळे प्रकरण उलटतपासाकरीता तहकूब.***

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.04.25 17:01:06 +0530

(आर. एम. भेंडे)

दिनांक :- १७/०४/२०२५

सह दिवाणी न्यायाधीशे क.स्तर, वाई.